**शासन परिपत्रक क्रमांक शिष्यवृत्ती–२०१७/प्र.क्र.३४/शिक्षण सोबतचे**

परिशिष्ट " अ "

**<u>सन २०१७–१८ ची शिक्षण शुल्क मिळण्यासाठी</u>**

<u>हमीपत्र/प्रतिज्ञापत्र</u>

१) मी/आम्ही खाली सही करणार/करणारे प्रतिज्ञापत्र करतो की, शुल्क मिळण्याबाबतच्या अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत. अर्जात वरीलप्रमाणे दिलेली सर्व माहिती पूर्णपणे सत्य आहे. सदरची माहिती खोटी अथवा अपुरी आढळल्यास भारतीय दंडविधाना प्रमाणे होणाऱ्या दंडास/शिक्षेस मी/आम्ही पात्र आहे/आहोत. त्यापैकी कोणतीही माहिती व निवेदन चुकीचे आढळून आल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल व तो माझ्यावर/आम्हावर बंधनकारक असेल अशी मी/आम्ही हमी देतो. जर शिष्यवृत्तीची रक्कम जास्तीची मिळाली तर मी/आम्ही परत करेन/करू अशी जास्तीची अथवा अन्य कारणामुळे वसुल करण्यात येणारी रक्कम मी/आम्ही पूर्णपणे परत करण्याची हमी देतो. उत्पन्नाची व जातीची माहिती खोटी आढळल्यास माझे/माझ्या पाल्याचे विरूध्द होणाऱ्या कारवाईस मी/आम्ही स्वत: जबाबदार राहू.

२) मी अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे मी सक्षम अधिकाऱ्याकडून/प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केलेली असून ती कागदपत्रे खरी असून योग्य मार्गाने मिळविलेली आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार/दुरूस्ती/बदल केलेला नाही. ती खोटी अथवा नकली नाहीत हे मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो. अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे खोटे अथवा बनावट आढळल्यास त्यास मी/आम्ही पुर्णत: जबाबदार असून त्यासाठी भारतीय दंड विधान कायदा कलम १९९ व २०० नुसार लागू होणाऱ्या शिक्षेस मी पात्र राहीन याची मला पुर्ण जाणीव आहे.

३) माझे अर्जानुसार मला जर शिष्यवृत्तीची जास्तीची रक्कम मिळाली तर ती मी/आम्ही परत करेन/करू अशी जास्तीची अथवा अन्य कारणामुळे वसुल करण्यात येणारी रक्कम मी/आम्ही पूर्णपणे परत करण्याची हमी देतो.

४) सन २०१७–१८ या वर्षाची पहिल्या हप्त्याची शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची रक्कम बँक खात्यात जमा होताच मी ती महाविद्यालयास सात दिवसात जमा करून रितसर पावती प्राप्त करून घेण्याची माझी/आमची जबाबदारी असेल. शुल्क महाविद्यालयास जमा न केल्याने भविष्यात उद्भवणाऱ्या परिणामास मी/आम्ही वैयक्तीक जबाबदार असु असे प्रतिज्ञापुर्वक हमीपत्र/बंधपत्र मी/आम्ही सादर करीत आहोत.

ठिकाण :– ................................................

दिनांक :–    /    /२०

अर्जदाराच्या पालकाचे नाव :– ........................................................................................ सही .........................

अर्जदाराचे नाव :– .............................................................................................................सही ..............................